# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

## अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 11]

दिनांक : 13/3/2018 वेळ : सकाळी 11.30 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे मार्च 2018 ची मासिक सभा मंगळवार दिनांक 13/3/2018 रोजी सकाळी 11.30 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

1. मा. केशव हनुमंत घोळवे — सभापती
2. मा. अनुराधा गणपत गोरखे — सदस्या
3. मा. यादव मिनल विशाल — सदस्या
4. मा. प्रमोद कुटे — सदस्य
5. मा. बाबर शर्मिला राजू — सदस्या
6. मा. अमित राजेंद्र गावडे — सदस्य

याशिवाय श्रीम. आशादेवी दुरगुडे – मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री. संजय खाबडे- मा. कार्यकारी अभियंता, विदयुत, श्री. सतिश इंगळे – मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. विशाल कांबळे – मा. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा , श्री. आर.के.लटपटे – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री संजय काशीद, श्री. संजय तुपसाखरे, श्री. राजेंद्र इंगळे, श्री लक्ष्मीकांत कोल्हे, श्री. सुभाष काळे, श्री अनिल शिंदे , श्री. चंद्रकांत मुठाळ, श्रीम. एल.एस.बाबर - उपअभियंता , श्री कदम पी.जे. – लेखाधिकारी, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, , श्रीम साळुंके अस्मिता, श्री. शेख एस.के. - कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, श्री. पारसी एन.एस. – आरोग्य निरीक्षक [ पशुवैदयकीय ] , श्री. जी.एन.खुळे – उदयान सहाय्यक, वृक्षसंवर्धन इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. मागील दि. 16/2/2018 रोजीचा सभावृत्तांत कायम करतेवेळी चिंचवड स्टेशन येथील चौकास लहुजी वस्ताद यांच्या स्मरणार्थ " **क्रांतीवीर लहुजी वस्ताद चौक** '' असे नामकरण करणेकामीचा ठराव अनावधानाने मान्य झाला आहे. तथापि, सदर चौकास यापुर्वी " **भगवान महावीर चौक** '' असे नाव देणेकामी ठराव संमत झाला असून त्याप्रमाणे बोर्ड देखील आहे. त्यामुळे सदरील चौकास यापुर्वीचेच असलेले नाव कायम करणेत येत असून दि. 16/2/2018 रोजी ठराव क्रमांक 170 विषय क्रमांक 5 अन्वये झालेल्या ठरावानुसार सदर चौकामध्येच इतरत्र नाव नसलेल्या रस्त्यास अथवा भागास सदरचे नाव देणेत यावे. सदरचे बदलानुसार दि. 16/2/2018 रोजीचा सभावृत्तांत कायम करणेत आला असल्याचे मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी जाहीर केले व स्थापत्य विभागामार्फत सदरील चौकातील भगवान महावीर चौक बोर्ड दर्शनीभागामध्ये तातडीने लावणेत यावा अशा सुचना देण्यात आल्या. तदंनतर सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक :- 2** सन्मा. सदस्य जावेद शेख यांचा दि. 12/3/2018 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील बाँबे सिलेक्शन रेल्वे रुळापासून ते पीसीपी कॉलेज पर्यंत असणा-या 18 मी. रस्त्यास " **हाजी मुश्ताक अब्दुलरेहमान सय्यद उर्फ भाईजान मार्ग** '' असे नाव देणेस तसेच अजय अहिरेकर यांच्या मिळकतीपासून ओम कॉम्प्लेक्स लगत असणा-या अंतर्गत रस्त्यास " **कै. गेनू रामा कुटे मार्ग** '' तसेच विठ्ठलवाडी येथील इंद्रप्रस्थ हौ. सोसायटीपासून नाल्यापर्यंत असणाल्या रस्त्यास " **कै. कॉम्रेड उत्तमराव रामचंद्र गायकवाड मार्ग** '' असे नामकरण करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक :- 3** सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा दि. 13/3/2018 चा प्रस्ताव

अ प्रभागामध्ये विविध कारणासाठी सुरु असलेली रस्ते खोदाई त्वरीत करुन झालेली खोदाई पुन्हा पुर्ववत करुन रस्ते दुरुस्त करुन घ्यावेत. पावसाळा सुरु होत आहे त्यामुळे सदरची कामे त्वरीत करुन घ्यावीत. तसेच पावसाळयापुर्वी खोदाई व विजेची कामे विदयानगर, इंदिरानगर, लालटोपीनगर, दत्तनगर या झोपडपट्टीतील सर्व विजेची कामे त्वरीत करावीत.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक 172 | विषय क्रमांक 1 |
| दिनांक 13/3/2018 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव |
| सुचक: मा. प्रमोद कुटे | अनुमोदक : मां. मिनल यादव |

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचेकडील दि. 12/2/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील शुभश्री हौ. सोसायटी, आकुर्डी शेजारी सुरु असलेल्या क्रिडा व उदयानाला अ प्रभाग समितीमध्ये ठराव क्रमांक 29 दि 13/7/2016 प्रमाणे सदर क्रिडांगणास " **कै. निवृत्ती भालेराव क्रिडांगण** '' व ठराव क्रमांक 34 दि. 13/7/2016 प्रमाणे उदयानास " **कै. तुळसाआई पांढरकर उदयान** '' असे ठराव मंजुर झाले होते तरी यापुर्वी झालेल्या ठरावाप्रमाणे नाव न बदलता संबंधित पुर्ण प्रकल्पाला " **जेष्ठ निरुपणकार महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब तथा नारायण विष्णू धर्माधिकारी उदयान व क्रिडांगण** '' असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 173
दिनांक 13/3/2018
सुचक: मा. प्रमोद कुटे

विषय क्रमांक 2
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्य जावेद शेख यांचा दि. 12/3/2018 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील बाँबे सिलेक्शन रेल्वे रुळापासून ते पीसीपी कॉलेज पर्यंत [PCP] असणा-या 18 मी. रस्त्यास " **हाजी मुश्ताक अब्दुलरेहमान सय्यद उर्फ भाईजान मार्ग** '' असे नाव देणेस तसेच अजय अहिरेकर यांच्या मिळकतीपासून ओम कॉम्प्लेक्स लगत असणा-या अंतर्गत रस्त्यास " **कै. गेनू रामा कुटे मार्ग** '' तसेच विठ्ठलवाडी येथील इंद्रप्रस्थ हौ. सोसायटीपासून नाल्यापर्यंत असणाल्या रस्त्यास " **कै. कॉम्रेड उत्तमराव रामचंद्र गायकवाड मार्ग** '' असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 174
दिनांक 13/3/2018
सुचक: मा. प्रमोद कुटे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे व शर्मिला बाबर यांचा दि. 12/3/2018 चा प्रस्ताव

अ प्रभागामध्ये विविध कारणासाठी सुरु असलेली रस्ते खोदाई त्वरीत करुन झालेली खोदाई पुन्हा पुर्ववत करुन रस्ते दुरुस्त करणेस पावसाळा सुरु होत असल्यामुळे सदरची कामे त्वरीत करुन घेणेस तसेच पावसाळयापुर्वी खोदाई व विजेची कामे विदयानगर, इंदिरानगर, लालटोपीनगर, दत्तनगर या झोपडपट्टीतील सर्व विजेची कामे त्वरीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरीलप्रमाणे कामकाज झालेनंतर सन्मा. नगरसदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.

- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांनी महापालिकेमध्ये अनुकंपा तत्वावर भरती झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्याच पदाचेच काम देणेकामी मुद्दा उपस्थित केला असता सहा. आरोग्याधिकारी यांनी शैक्षणिक अर्हतेनुसार प्रशासन विभागामार्फत नेमणूक दिली जाते. वर्ग तीन मधील वारस म्हणून नेमणूक असेल तर इतरत्र विभागामध्ये आवश्यकतेनुसार नेमणूक प्रशासनामार्फत दिली जाते अशी माहिती दिली. यावर सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी सदरचा विषय हा प्रशासन, मुख्य कार्यालय यांचेशी संबंधित असल्याने मुख्यालयामध्ये मिटींग घेऊन चर्चा करणे सोयीचे होईल असे सांगितले.
- सन्मा. नगरसदस्या मिनल यादव यांनी त्यांचे प्रभागामध्ये इलेक्ट्रीशियन एकच असल्याने अडचणी येत असल्याचा मुद्दा उपस्थित केला असता मा. कार्यकारी अभियंता, विदयुत यांनी विभागातील तीन वायरमन सेवानिवृत्त झाले आहेत त्यामुळे नव्याने वायरमन मिळणेकामी प्रशासन विभागाकडे मागणी केले असलेबाबत सांगितले.
- सन्मा. नगरसदस्या शर्मिला बाबर यांनी प्रभागामध्ये 24 x 7 चे काम कधील पुर्ण होणार आहे तसेच प्रभागामध्ये सगळीकडे खड्डे पडले असल्याने अनेक अडचणी येत असलेबाबत मुद्दा उपस्थित केला असता उपअभियंता यांनी वाहतूक विभागास 15 दिवसांपूर्वी पत्र दिले असून अदयाप त्यांचेकडील परवानगी आली नसल्याचे सांगितले. यावर सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी सदर पत्राची ऑफीस कॉपी घेऊन आजच श्री पवार यांच्याकडे जाणेकामी सुचना दिल्या.
- सन्मा. नगरसदस्य प्रमोद कुटे यांनी खंडोबा माळ चौक येथील रस्त्याच्या रुंदीनुसार दोन्ही बाजूने लाईट्स लावणेत याव्यात असे विदयुत विभागास सुचविले.

प्रस्तुत बैठकीमध्ये मा. ना. डॉ. पंतगराव कदम, कॉग्रेसचे ज्येष्ठ नेते, सदानंद चांदेकर – ज्येष्ठ एकपात्री कलाकार, माजी नगरसदस्या डॉ. कमरुनिसा खान यांचे निधन झाल्याने सभागृहामध्ये दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली. वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले

[ केशव हनुमंत घोळवे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/11/कावि/61 /2018 दि 20/3/2018

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ------------------------